**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक - ३०/०३/२०२३

**दि.२९/०३/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली २२४/२०२३ भा.द.वि.क. ३०७,३६४,३४१,३२४,३२३,५०४,५०६, ३४ सह आर्म अ‍ॅक्ट कलम ४(२५) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. २९/०३/२०२३ रोजी पहाटे ०५.१० वा. चे सुमारास बिल्डिंग सी-३४, एकता हौसिंग सोसायटि, घरकुल, चिखली, पुणे याचे समोरील सार्वजनिक रोडवर व बी-७/७०६, वृंदावन हौ. सोसायटि, घरकुल, चिखली, पुणे येथे फिर्यादी यांचे राहते फ्लॅट समोर |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०३/२०२३ रोजी २०/३६ वा |
| फिर्यादी | :- | अमित अशोक चव्हाण, वयः- ३३ वर्षे, धंदाः- केटरिंग व्यवसाय, राह. बी-७/७०६, वृंदावन हौ. सोसायटि, घरकुल, चिखली, पुणे |
| आरोपी | :- | १) ओंकार ओव्हाळ त्याचे मित्र २) पांढ-या रंगाचा हाफ बाहयांचा टि-शर्ट, निळया रंगाची हाफ बर्मुडा पॅन्ट व पांढरी टोपी घातलेला मुलगा, तर तिस-या मुलाने ३) गुलाबी रंगाचा हाफ बाहयांचा टि-शर्ट व काळया रंगाची पॅन्ट घातलेली होती. **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील साक्षीदार धिरज आढाव हे बिल्डिंग सी-३४, एकता हौसिंग सोसायटि, घरकुल, चिखली, पुणे याचे समोरील रोडवरुन घरी जात असताना यातील ३ आरोपीत मजकुर यांनी धिरज आढाव यांचा रस्ता अडवुन त्यास स्क्रु ड्रायव्हरने त्याच्या डोक्यात, हातावर, पायावर मारहाण करुन ''अमित चव्हाणचे घर दाखव नाहितर तुझा मर्डर करणार'' अशी भिती घालुन धमकी देत, शिवीगाळी करत त्याचा खुन करण्याच्या उद्देशाने त्यास त्यांचेकडील अ‍ॅक्टिवा सारखे गाडीवर जबरदस्ती बसवुन त्याचे अपहरण करुन घरकुल चे बाहेर घेवुन जाऊ लागले, तेव्हा धिरज आढाव याने त्यांना फिर्यादी यांचे घर दाखवले असता फिर्यादी यांचे राहते फ्लॅट समोर सातव्या मजल्यावर त्यातील आरोपी क्रं १ याने त्याचे कडील कोयत्याने फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांचे गळयावर वार करुन फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. सदर वेळी झालेल्या झटापटीमध्ये कोयत्याचा वार साक्षिदार धिरज आढाव याचे डोक्यास लागुन दुखापत झालेली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोलीस उप-निरिक्षक, श्री. विवेक कुमटकर मोबा. ९५५२५३६४३२ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे १६७/२०२३ भादवि कलम ३०७,३२३,५०४,५०६,३४, आर्म अँक्ट क ४(२५),महा पोलीस अधि क. ३७(१) (३) सह १३५ व क्रिमीनल अँ. क.७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२८-०३-२०२३ रोजी १९-३० वा व दि२९/०३/२०२३ रोजी रात्रौ ०१/०० वा चे सुमा. राहते घराजवळ व गार्डन जवळ, यशवंत नगर, तळेगाव दाभाडे ता मावळ जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०३/२०२३ रोजी १२.१४ वा |
| फिर्यादी | :- | विशाल नंदकिशोर खंदारे वय २४ वर्षे व्यवसाय चालक रा. विलास बनसोडे यांचे घरात भाडयाने दत्त सेवा सोसायटी, फ्लॅट नं. ९, शिवाजी चौक, तळेगाव दाभाडे ता मावळ जि पुणे |
| आरोपी | :- | १) मयुर अंकुश मते वय ३१ वर्षे रा. भिमाशंकर कॉलनी, वराळे पुणे,<br>२) स्वप्नील उर्फ मोन्या आनंद जाधव रा. वराळे फाटा, ता मावळ पुणे, |

३) गणेश उर्फ सौरभ आनंद जाधव वय २२ वर्षे रा सदर
**आरोपी क्र.१ व ३ अटक आहे**

| | | |
|---|---|---|
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे नावावर आरोपी क्र १ याने मोबाईल विकत घेतला होता त्याचे आरोपी हप्ते भरत नसलेने फिर्यादींनी आरोपीस मोबाइलचे हप्ते का भरत नाही असे विचारले असता त्याचा त्यास राग आल्याने आरोपी क्र १ ते ३ हे दुचाकीवरुन येवुन मी हप्ते भरणार नाही जा तुला काय करायचे ते कर अशी धमकी देवुन शिवीगाळ करुन आरोपी क्र १ याने त्याचे हातातील लोखंडी कोयत्याने फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याच्या उदेशाने फिर्यादीचे डोक्यात वार केल्याने फिर्यादी जखमी होवुन खाली पडले त्यानंतर आरोपी क्र १ याचे हातातील कोयता आरोपी क्र ३ याने घेवुन उलटया बाजुने व सरळ बाजुने तिन ते चार वेळा जिवे ठार मारण्याच्या उदेशाने डोक्यावर व अंगावर हातावर वार केले. त्यानंतर आरोपी क्र २ याने लाथाबुक्यांनी फिर्यादी मारहान केली. तसेच स्टेशन रोड वरुन जाणारे येणारे प्रवाशी हे भांडण पाहुन भयभित होवुन सैरावैरा पळत होते. तसेच हातातील कोयता फिरवत सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोसई मुल्ला ९५०३०७१५७८ |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | तळेगाव एमआयडीसी ७५/२०२३ भा.दं.वि.क. ३४१,३३७,१४३,१४४,१४८,१४९,३२३,५०४, महाराष्ट पालीस अधीनीयम ३७ १,१३५` |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ता.२९/०३/२०२३ रोजी १४/०० वा चे सुमारास मौजे.मिंडेवाडी नवलाख उंब्रेता मावळ जि पुणे येथे बोनफिगलोली बि टी पी एल या कंपनीच्या बाधकाम साईटवर |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०३/२०२३ रोजी २१/२५ वा |
| फिर्यादी | :- | अनील मारुती नरवडे वय ४० वर्षे धंदा-क्रेन सर्विव्हीस रानवलाख उंबरेता मावळ जि पुणे, |
| आरोपी | :- | १ बळीराम मराठे रा.मिंडेवाडीता मावळ जि पुणे, २)हेमंत शेळके रा. तळेगाव ता मावळ जि पुणे<br>३ शाम शे्ळके रा.तळेगाव ता मावळ जि पुणे४ विजय लांडे रा.तळेगाव ता मावळ जि पुणे<br>व इतर ३ ते ४ लोक पुर्णनाव पत्ता माहीत नाही **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद केले तारखेस, वेळी व ठिकाणी यातील आरोपीत मजकुर यांनी बेकायदेश्ीर जमाव जमवुन कंपनीमधील क्रेनच्या कॉन्ट्रक्टच्या आपसातील वादावरून फिर्यादी व त्याच्या कामगारानां काम करण्यास रोखुन शिवीगाळ दमबाजी करून हातात लाकडी दाडके व दगड घेवुन फिर्यादी व साक्षीदारांना लाकडी दाडक्याने मारहाण करून दगड फेकुन मारून तसेच हाताने धक्का बुक्की केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनिरी वालकोळी मोनं ९९२३६९३२७८ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी २०१/२०२३ भादवि कलम ४२०, ४०८, ३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | सन २०१६ पासुन ते दि.२९/०३/२०२३ रोजी अखेर कालावधीत वेळोवेळी फिर्यादी यांचे मालकीचे श्री अंबिकाज्वेलर्स व पार्श्व गोल्ड नावाचे सोन्याचे दागीने होलसेल विक्रीचे ऑफिसमध्ये पिंपरीचिंचवड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०३/२०२३ रोजी २३/४९ वाजता |
| फिर्यादी | :- | विरेंद्र छगनलाल जैन वय ४६ वर्षे धंदा- व्यापार रा. फ्लॅट नंबर ९०१, दहावा मजला, शंखेश्वरदर्शनबिल्डींग, नेहरुनगर पिंपरी पुणे १८ |
| आरोपी | :- | १) खुशाल दिलीप ओसवाल रा. ग्रीनफिल्ड सोसायटी, अजमेरा पिंपरी यानेत्याचे साथीदार<br>२) विमल चौहान रा. मुंबई व ३) रोहीत ओसवाल रा. कोल्हापूर<br>**आरोपी अटक नाही** |

तपशिल :- यातील फिर्यादी यांचे मालकीच्या श्री अंबिका ज्वेलर्स व पार्श्व गोल्ड दुकानांच्या टिळक चौक निगडी व शंखेश्वर दर्शन बिल्डींग नेहरुनगर पिंपरी येथे सोन्याचे होलसेल दागीने विक्रीचे ऑफीस असुन ऑफिसमध्ये अकाउंट, मार्केटींग व स्टॉकचे कामासाठी नेमलेला कामगार आरोपी क्रं १ याने फिर्यादी यांनी त्यास अकाउंट, मार्केटींग व स्टॉकचे काम विश्वासाने सोपविले असतांना अन्यायाने कामावर असतांना वेळोवेळी दिनांक २९/०३/२०२३ रोजी पर्यंत कालावधीत त्याचे साथीदार आरोपी क्रं २ व ३ यांचेशी संगनमत करुन एकूण अंदाजे ५ किलो वजनाचे सोने ज्याची एकूण किंमत अंदाजे २,५५,००,०००/- रुपये किंमतीचा अपहार करुन फिर्यादीची आर्थीक फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- श्री. जितेंद्रकदम पोलीसनिरिक्षक ,युनिट.२ गुन्हे शाखा ९८२३३४८००७

५.

पोस्टे व गु रजि.नं. :- शिरगाव ९०/२०२३ भा.द.वी कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२७/०३/२०२३ रोजी २०.०० वा.चे. सुमा.ते दि.२९/०३/२०२३ रोजी १४/३० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे रहाते घर उर्से, ता.मावळ, जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि.२९/०१/२०२३ रोजी १९.३५ वाजता

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- अनोळखी इसम

तपशिल :- वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे पती गुजरात येथे कामानिमित्त गेल्याने यातील फिर्यादी त्यांच्या मुलांसह त्यांच्या माहेरी गेलेली असताना फिर्यादी यांची ननंद हिने फिर्यादीस फोन करुन सांगितले की, तुझ्या घराचे दार उघडे आहे . फिर्यादी यांनी घरी येवुन पाहिले असता फिर्यादी यांचे राहते घर उर्से,ता.मावळ,जि.पुणे या घराचे सेफटी डोअरचे कुलूप कशाचेतरी साहयाने कोणीतरी अज्ञात चोरटयाने तोडल्याचे दिसले ,दरवाजा उघडा होता व घराचे बेडरूमध्ये ठेवलेले ३४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने ,चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकुण २,३२,३००/- रु किं चा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने स्वतःचे फायदयासाठी घरफोडी करुन चोरून नेला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पो.उपनिरिक्षक येडे मो. न९७६३७२७५२२

६.

पोस्टे व गु रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी १२६/२०२३ भादंवि कलम ३८० प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२९/०३/२०२३ रोजी १५/३० वा. चे सुमारासन्यु लुक सलुन शाहु नगर चिंचवड

गुन्हा दाखल :- दि.२९/०३/२०२३ रोजी २३/३० वा.

फिर्यादी :- मोहमंद रिफाकत मोहमंद इस्लाम शेख वय ३३ वर्षे धंदा व्यवसाय रा. गट १३९८ गोकुळ सोसायटी साईबाबा मंदिराजवळ,मोरे वस्ती चिखली

आरोपी :- एक अनोळखी इसम.

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी त्याचा ८०,०००/- रु किं चा आयफोन १४ हा मोबाईल दुकानामध्ये टेबलवर ठेवला असता तो एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय,लबाडीच्या इराद्याने चोरुन नेला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि एन बी चपाले ९०८२८६६२२५

७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी १४१ /२०२३ भा.दं.वि. कलम २७९,३३७,३३८.४२७,३०४ (२) व मोटार वाहन कायदा कलम ४/१२२,१७७ ए, १३४ (ब),१७७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २८/०३/२०२३ रोजी १६/३० वा दरम्यान वडमुखगांवचे हदीत एनएम इंजीनियरिंगचे कंपनी समोर. |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०३/२०२३ रोजी १५/४१ वा |
| फिर्यादी | :- | गणेश दशरथ कळंके पो.हवा./१४२ दिघी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचववड. |
| आरोपी | :- | युवराज संताराम गाडे वय ४३ वर्षे रा. रुपीनगर, शिवशंभो सोसायटी, पुणे.<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व जागी अलंकापुरम चौक ते गोडावुन चौक पक्की डांबरी रोडवर वडमुखवाडी गांवचे हददीत एन.एम. इंजिनियरींग कपंणीच्या समोर यातील आरोपी याने आपल्या ताब्यातील ट्रक नं एम.एच./४६/ऐ.एफ./८३८८ ही गोडावून चौक बाजुकडून अलंकापुरम चौक बाजुकडे हयगयीने, अविचाराने, निष्काळजीपणे, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन रॉंग साईडला जावून अलंकापुरम बाजूकडून गोडावुन चौक बाजुकडे समोरुन येणारे स्प्लेंन्डर प्लस नंबर एम.एच./१४/डी.आर./०६७२ हिस ठोस देवून अपघात करुन मोटार सायकल स्वार इसम नामे संपत श्रीरंग कदम व त्याच्या पाठीमागे बसलेली महिला दोन्ही रा. गंदर्धनगरी, तापकरीनगर, मोशी पुणे यांना अपघातात किरकोळ व गंभीर दुखापतीस कारणीभुत होवून मोटार सायकल स्वार नामे संपत श्रीरंग कदम याचे मूत्युस कारणीभुत झाला. व अपघात झाले असल्याचे माहित असताना सुध्दा मोटार सायकल स्वार यांना तातडीने उपचाराची गरज असताना व त्यामध्ये त्यांचा जिव जाईल हे माहित असताना कोणतीही वैदकिय मदत न करता जाणिवपुर्वक ट्रक सोडून पळून गेला आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पो उप निरी भंडारे दिघी पो स्टे पिं चिं मो नं ९९२३३८३३००७ |

८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ३६२/२०२३ भा.दं.वि.कलम ५०९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२८/०३/२०२३ रोजी २१/३० वा.चे सुमारास राहते घराजवळ ,रा.सावता माळी मंदिरासमोर, भुजबळवस्ती,वाकड,ता.मुळशी,जि.पुणे.येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०३/२०२३ रोजी ००.५६ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी वय १८ वर्षे |
| आरोपी | :- | शुभम अनिल पारखी,वय-२२ वर्षे,धंदा-व्यवसाय ,रा.काळभैरवनाथ मंदिरा जवळ,माणगांव,ता. मुळशी,जि.पुणे.<br>**सीआरपीसी ४१ (१)(अ) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी नमुद आरोपीने फिर्यादी व त्यांची आजी घरी असतांना आरोपी फिर्यादी चे राहते घराजवळ आला व फिर्यादीला घराबाहेर बोलविले,कदाचित तो दारु पिऊन आल्याचे वाटल्याने फिर्यादी बाहेर जात नसल्याचे पाहुन आरोपीने फिर्यादीला उददेशुन वाईट-वाईट अश्लिल शिवीगाळ करुन मोठमोठयाने आरडाओरडा करुन आरोपीने फिर्यादी तसेच आजुबाजुच्या इतर लोकांना ऐकु जाईल अशा प्रकारे त्याने फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ केली म्हणुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होवुन विनयभंग होईल अशा प्रकारे मोठमोठयाने फिर्यादीचे कानावर पडतील असा अश्लिल शब्दोउच्चार करुन फिर्यादीचे एकांतपणाचा भंग केला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खडके ७७४१९९६३४३ |

९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ३३६/२०२३ महाराष्ट्र दारुबंदी अधि. कलम ६५(फ) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२९/०३/२०२३ रोजी १२.०० वा चे सुमारास.शेलपिंपळगांव ता.खेड जि.पुणे गावचे हददीत भिमा नदीचे काठावर |
| गुन्हा दाखल | :- | दि २९/०३/२०२३ रोजी १६.३० वा |
| फिर्यादी | :- | राहुल हरीश्चंद्र सुर्यवंशी, पो.शि.२७१८ नेमणुक गुन्हे शाखा,युनिट-३, पिंपरी चिंचवड शहर |
| आरोपी | :- | बिरबल राठोड रा. पिंपळगाव, ता. खेड, जि. पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमूद केले तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने बेकायदा गावठी हातभटटी साठी लागणारे अंदाजे २,००,०००/- रु. चे ४००० लिटर कच्चे रसायण जवळ बाळगुन हातभटटीचे दारुची भट्टी लावत असताना प्रोव्ही माल अनाधिकाराने, विनापरवाना, बेकायदेशीररित्या विक्री करीता जवळ बाळगला असताना पोलीसांची चाहुल लागताच पळून गेला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पो हवा आहेरकर मोनं-९०७५६२७२९२ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी १३६ /२०२३ भा.द.वि.कलम ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२५/०३/२०२३ रोजी १७.१५ वा. ते दि.२८/०३/२०२३ रोजी ०८.३० वा.चे दरम्यान रक्षक चौक,पिंपळे निलख पुणे येथील रोडचे कडेला फुटपाथवरुन |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०३/२०२३ रोजी १६/४० वा. |
| फिर्यादी | :- | फारुख मज्जीद शेख वय ४० वर्षे धंदा-नोकरी,रा.सर्वे नंबर १०,कामराज नगर,सेवक चौक, येरवडा,पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात आरोपी |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची १०,०००/- रु किं ची हिरो होंडा कंपनीची सी.डी.डिलक्स मोटारसायकल तिचा आर.टी.ओ नंबर MH 12 FG 1155 ही रोडचे कडेला फुटपाथवर पार्क करुन लॉक करुन ठेवली असता ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय मुद्दाम लबाडीच्या इराद्याने चोरुन नेली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा १३९४ चव्हाण ८०८०२०६५५६ |